# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई CB 43/2026

## प्रेसनोट

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक २०/०७/२०२६ |
|---|---|

**''चैन स्नॅचिंग व मोटर सायकल चोरी करणाऱ्या सराईत आंतरराज्य टोळीला मध्यवर्ती गुन्हे शाखेकडुन अटक, १२ लाख रूपये किंमतीची मद्देमाल हस्तगत, ०९ गुन्हे उघड''**

श्री.मिलींद भांरबे, पोलीस आयुक्त, श्री.दीपक साकोरे, पोलीस सह आयुक्त, श्री. प्रमोदकुमार शेवाळे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये महिला संबंधीच्या गुन्हयांना प्रतिबंध करण्याचे व रस्त्यावर घडणारे गुन्हे (Street Crime) प्राधान्याने उघडकीस आणण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

दिनांक १५/०५/२०२६ रोजी दोन अनोळखी इसमांनी महिलेच्या गळयातील ३० ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून, तिचे गळयास दुखापत करून काळया रंगाची युनिकॉर्न मोटार सायकलवरून पळून गेलेबाबत खांदेश्वर पोलीस ठाणे गु.र.नं. १४३/२०२६, भान्यासं कलम ३०९(६), ३(५) अन्वये गुन्हा दाखल आहे. गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान मध्यवर्ती गुन्हे शाखेकडील तपास पथकाने घटनास्थळ व नवी मुंबई परिसरातील सी.सी.टी.व्ही. कमेऱ्यांची पाहणी करून तांत्रिक माहिती उपलब्ध केली. तपासादरम्यान कामोठे परिसरातून आरोपीचे छायाचित्र प्राप्त करून मिरारोड येथुन २ आरोपी व राज्य बिहार येथुन १ आरोपी ताब्यात घेतला. आरोपी क्रमांक **(१)रियाज रमजान शेख उर्फ रियाज आलम रमजान अली,** वय—४२ वर्षे, रा. ओम शांती चाळ, जानुपाडा, वैभवनगर, कांदीवली ईस्ट, मुंबई. मुळ रा. मनोरवा खैरा, पो.स्टे.बिथान, जि.समस्तीपुर, राज्य बिहार. **(२)जमालबादशा मनिरूल गाझी,** वय—३१ वर्षे, रा. मीरारोड १५ वे कोर्ट जवळील झोपडपट्टी. मुळ रा.खरडड्ा, पो.स्वरूपनगर, उत्तर २४ परगाना, वेस्ट बंगाल यांना खांदेश्वर पोलीस ठाणे गु.र.क्र. १४३/२०२६, भान्यासं कलम ३०९(६), ३(५) या गुन्हयात अटक केली. आरोपी क्रमांक **(३)आशिक बिल्ला गाझी,** वय—२२ वर्षे, धंदा—बेकार, रा.मीरारोड १५ वे कोर्ट जवळील झोपडपट्टी. मुळ रा.खरडड्ा, पो.स्वरूपनगर, उत्तर २४ परगाना, वेस्ट बंगाल यास कामोठे पोलीस स्टेशन गु.रजि.नं.१६५/२०२६, भान्यासं कलम ३०९(४), ३(५) या गुन्हयात अटक केली आहे. अटक आरोपींची दिनांक २०/०७/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर असुन पुढील तपास मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा करीत आहे. उघडकीस आलेले गुन्हे व हस्तगत मुद्देमालचे वर्णन खालीलप्रमाणे,

**नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील,**

१) खांदेश्वर पोलीस ठाणे, गु.र.नं. १४३/२०२६, भान्यासं कलम ३०९(६), ३(५).
२) कामोठे पोलीस ठाणे, गु.र.नं. १६५/२०२६, भान्यासं कलम ३०९(६), ३(५).
३) कामोठे पोलीस ठाणे, गु.र.नं. १२७/२०२६, भान्यासं कलम ३०९(६), ३(५).
४) खारघर पोलीस ठाणे, गु.र.नं. २७२/२०२६, भान्यासं कलम ३०९(४), ३(५).

**ठाणे पोलीस आयुक्तालयातील,**

५) नारपोली पोलीस ठाणे गु.रजि.नं. ४१७/२०२६ भान्यासं कलम ३०९(४), ३(५).

**मिरा भाईदर—वसई विरार पोलीस आयुक्तालयातील,**

६) पेल्हार पोलीस ठाणे गु.र.नं. ७०९/२०२६, भान्यासं कलम ३०९(४), ३(५).

**मुंबई पोलीस आयुक्तालयातील,**

७) अंधेरी MIDC पोलीस ठाणे, मुंबई शहर गु.र.नं. ९७२/२०२५,भान्यासं कलम ३०९(४)
८.

८) समता नगर पोलीस ठाणे मुंबई शहर गु.र.नं. १०४१/२०२६, भान्यासं कलम ३०३(२). (मो/सा.चोरी)

९) समता नगर पोलीस ठाणे, मुंबई शहर, गु.र.नं २१६/२०२६, भान्यासं कलम ३०३(२). (मो/सा.चोरी)

**हस्तगत मालमत्ता,**

१ सोन्याचे मंगळसुत्र, ४ सोन्याच्या चैन, १ तुटलेल्या सोन्याच्या चैनीचे तुकडे, असे एकुण ९५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व २ मोटार सायकल असा एकुण **१२,००,०००/— रूपये किंमतीचा मुद्देमाल.**

**अटक आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभुमी,**

- **आरोपी रियाज रमजान शेख उर्फ रियाज आलम रमजान अली वय—४२ वर्षे,**

१) समता नगर पोलीस ठाणे, मुंबई शहर १४३/२०१३, भादंवि कलम ३७९.
२) विरार पोलीस ठाणे, गु.र.नं. ६२१/२०२१, भादंवि कलम ३९२, ३४.
३) विरार पोलीस ठाणे, गु.र.नं. ६०७/२०२१, भादंवि कलम ३९२, ३४
४) विरार पोलीस ठाणे, गु.र.नं. ६६६/२०२१, भादंवि कलम ३९२, ३४.
५) विरार पोलीस ठाणे गु.र.नं. ६६७/२०२१, भादंवि कलम ३९२, ३४.
६) तुळिंज पोलीस ठाणे. गु.र.नं. ९७१/२०२१, भादंवि कलम ३९२, ३४.
७) माणिकपूर पोलीस ठाणे, गु.र.नं. २६८/२०२१, भादंवि कलम ३९२, ३४.
८) माणिकपूर पोलीस ठाणे, गु.र.नं. २८९/२०२१, भादंवि कलम ३९२, ३४.

- **आरोपी जमालबादशा मनिरूल गाझी वय—३१ वर्षे,**

१) समतानगर पोलीस ठाणे मुंबई शहर ३२३/२०२२, भादंवि कलम ३७९. (मो/सा.चोरी)
२) समतानगर पोलीस ठाणे मुंबई शहर ३३५/२०२२, भादंवि कलम ३७९. (मो/सा.चोरी)
३) समतानगर पोलीस ठाणे मुंबई शहर ३०१/२०२२, भादंवि कलम ३७९. (भंगार चोरी)
४) मिरारोड पोलीस ठाणे, मिरा भाईंदर १५९/२०२२, भादंवि कलम ४५४, ४५७, ३८०. (घरफोडी)
५) कनकीया पोलीस ठाणे,मिरा भाईंदर, ३१२/२०२५, NDPS कलम८(सी), २०(ब),२.
६) नयानगर पोलीस ठाणे, मिरा भाईंदर, ३१२/२०२५, बीएनएस कलम ३०५(ए).

सदरची उल्लेखनीय कामगिरी श्रीमती प्रेरणा कट्टे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाने मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वपोनि श्री. अजय शिंदे, सपोनि, श्रीनिवास तुंगेनवार, सपोनि महेश जाधव, पोहवा/४८३० संजय राणे, पोहवा/४४७ नितीन जगताप, पोहवा/१९३६ सतिश चव्हाण, पोना/२८३३ सचिन टिके, पोना/२८३०अजय कदम यांनी केलेली आहे.

★★★★★★★★★★